International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# स्वामी रामानंद तीर्थ यांचे हैदराबाद मुक्तिसंग्रामातील योगदान

**श्रीमती सुनिता विकास वांगीकर**

संशोधक विद्यार्थिनी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**सारांश :**
१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले पण स्वातंत्र्यलढयाची परिपूर्ती अजून झाली नव्हती कारण काही संस्थानिकांनी भारतात विलीन होण्यास विरोध दर्शविला. पण तत्कालीन गृहमंत्री पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी अत्यंत संयमाने व मुत्सदीपणे ५६५ पैकी बहुतांश संस्थानांचे भारतात विलीनीकरण केले तरीही काश्मिर, जुनागड व हैदराबादच्या संस्थानिकांनी आपल्या प्रजेला स्वातंत्र्य देण्यास व भारतात विलीन होण्यास नकार दिला, आणि स्वातंत्र्य राहण्याचे मनसुबे रचू लागले, त्यातील हैदराबाद हे संस्थान निजामाच्या पोलादी जोखडाखाली होते, येथे आसफिया घराण्याची सत्ता १७२४ ला स्थापन झाली होती. या घराण्यातील राजे 'निजाम' या त्यांना मिळालेल्या पदवी वरून ओळखले जात.

**पारिभाषिक शब्द :** मुक्तिसंग्राम, गैरमुलकी, लोकशाही, चळवळ

**प्रस्तावना :**
हैदराबाद हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे तर लोकसंखेच्या दृष्टीने प्रथम क्रमांकाचे संस्थान होते. या संस्थानाचा विस्तार १६ जिल्हयात पसरला होता. यापैकी ८ जिल्हे तेलगु भाषिक, ३ जिल्हे कन्नड भाषिक तर ५ जिल्हे मराठी भाषिक म्हणजे आपल्या मराठवाडयातील होते. संस्थानाची लोकसंख्या १ कोटी ६३ लाख ३८ हजार ५३४ होती, तर क्षेत्रफ़ळ ८२३१३ चौ. मैल इतके होते .वार्षिक उत्पन्न २६ कोटी रुपयाचे होते . या संस्थानातील ८५% प्रजा हिंदू होती तर मुस्लीम ११% होते इतर धर्माचे ४ % लोक होते. संस्थानिक मात्र मुस्लिम होता.सरकारी नौकरी मध्ये मुस्लिमांचे प्रमाण ८०% हिंदूचे २० % असे होते. संस्थानात तेलगू, मराठी, कन्नड व उर्दू या प्रमुख भाषा होत्या मात्र १८८४ पासून उर्दूला राज्य भाषेचा दर्जा होता. सर्व राज्यकारभार उर्दू मध्येच होई. अल्पसंख्य असलेल्या मुस्लिमांना नोकऱ्यांत प्राधान्य होते.
११ जून १९४७ रोजी निजामाने आपण कोणत्याही संघराज्यात सामील होणार नाही तर स्वतंत्र राहणार अशी घोषणा केली. पुढे २७ नोव्हेंबर १९४७ ला भारत सरकारने निजामाशी जैसे थे करार केला . सातव्या निजामाचे नाव नवाब उस्मान अली खां असे होते, भारतातील सर्वात विलक्षण व विक्षिप्त संस्थानिक म्हणून सातवा निजाम ओळखला जात असे, अमेरिकेतील फोर्ड नंतर हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात श्रीमंत व्यक्ती होता. यास पैसा व सत्ता या दोन गोष्टीचे जबरदस्त आकर्षण होते. हा महत्वकांक्षी, हुशार तर होताच शिवाय राजकीय डावपेच करण्यात व कटकारस्थाने रचण्यात पुरेसा चतुर होता. उस्मान अलीने १९२१ मध्ये एक आदेश काढून सभा संमेलने, बैठका-प्रवचने, मिरवणुका यावर सक्त बंधने लादली. व्यायाम शाळा, आखाडे, खाजगी शाळा, ग्रंथालये परवानगी वाचून काढू नयेत अशी सक्ती करण्यात आली. गश्ती निशाण ५२ आणि ५३ या नावाने हे दोन आदेश हैदराबाद संस्थानात ओळखले जात होते. आपले राज्य हे मुस्लीम संस्कृती व उर्दू भाषा यांचे केंद्र असले पाहिजे या आग्रहापोटी सर्वसामान्य जनतेचा धर्म, संस्कृती आणि भाषा यांना दाबून टाकण्यात आले होते.छापखाना किंवा वृतपत्र सुरु करण्याची परवानगी हैदराबादला जाऊन थेट मंत्रिमंडळाकडून मिळवावी लागत असे व सहजासहजी ती मिळत नसे.
हैदराबादचा स्वातंत्र्यालढा हा भारतीय स्वातंत्र्य लढयाचाच भाग होता.येथील प्रजेला दुहेरी पारतंत्र्यात राहावे लागत होते. राजकीय पारतंत्र्य तर होतेच पण त्या बरोबर जनतेच्या शिरावर सांस्कृतिक, भाषिक आणि धार्मिक पारतंत्र्यही लादण्यात आले होते. ब्रिटीशांपेक्षाही अधिक दडपशाही आणि कोणताही उदारमतवाद न सहन करणारी राजकीय संस्कृती येथे नांदत होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वातंत्राचा जो लढा येथे चालवला गेला त्याचे नेतृत्व कर्मयोगी संन्यासी स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले. वास्तविक पाहता स्वामीजी हे हैदराबाद संस्थानाबाहेरील होते.स्वामीजींचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्हयातील सिंदगी या गावी 3 ऑक्टोबर १९०३ रोजी झाला. हे गाव संस्थानाबाहेर होते. पण सरकारी कागद पत्रात स्वामीजींचे जन्मगाव गुलबर्गा जिल्ह्यातील चिनमेल्ली असे नोंदविले आहे. (कारण हैदराबाद संस्थानात संस्थानाबाहेरील व्यक्तीस 'गैरमुलकी' ठरवून हद्दपार केले जाई.)

**उद्दिष्टे :**
1. हैदराबाद मुक्तिसंग्रामाची पूर्वपिटिका अभ्यासणे.
2. हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्वामी रामानंद तीर्थ यांची योगदान अभ्यासणे
3. स्वामी रामानंद यांनीहैदराबाद स्टेट कॉंग्रेस मध्ये केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

**विषय विवेचन-:**

निजामांनी खरे पाहिले तर हैदराबाद राज्यातील जनतेच्या सामाजिक आणि धार्मिक भावनांचा कधीच विचार केला नाही. त्याचप्रमाणे त्यांनी आर्थिक विकासाचाही फारसा प्रयत्न केला नाही. त्यांनी केवळ स्वहीत जोपासण्याचा प्रयत्न केला. जनतेवर अनेक निबंध लादले आणि त्यांच्या विकासाच्या दृष्टीने काहीच केले नाही. त्यामुळे मराठवाडयातील जनतेत निजामांच्या आर्थिक धोरणाच्या बाबतीत असंतोष निर्माण झाला. यामधूनच विविध संघटणा उदयास आल्या. तसेच नेतृत्वांचाही उदय झाला. यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू. देविसिंह चौहान गुरुजी, केशवराव घाडगे, चंद्रशेखर बाजपेयी, विनायकराव चारठाणकर, गुरुनाथराब कुरुडे, गंगाप्रसाद अग्रवाल, श्रीनिवासराब बोरीकर यासारखे अनेक नेतृत्व उदयास आले. याठिकाणी पुज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचा आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

**जीवन परिचय :-**

हैदराबाद मुक्ती संग्रामात ज्या अनेक वीरांनी कार्य केले. त्यात अग्रणी असलेले नेतृत्व म्हणजे स्वामी रामानंद तीर्थ होय. त्यांचा जन्म ३ ऑक्टो. १९०३ रोजी कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यात सिंदगी या गावी झाला. त्यांचे मुळ गाव विजापूर जिल्ह्यातील खेडगी. त्यांचे वडील पेशाने शिक्षक होते. त्यांचे मूळ नाव व्यंकटेश भगवानराव खेडगीकर (कुलकर्णी) मुळात वडिलांचा पिंड सन्वस्त वृत्तीचा असल्यामुळे लहानपणापासूनच त्यांच्यावर सन्यस्तवृत्तीचा प्रभाव जाणवतो. सिंदगी या ठिकाणी चौथीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर त्यांनी सोलापूरच्या नार्थकोट शाळेत प्रवेश घेतला. याचकाळात गांधीजीची असहकार चळवळ चालू होती. यावेळी स्वामीजींनी आपल्यासोबत २०० विद्यार्थ्यांना गांधी टोपी घातली आणि यातूनच त्यांची राष्ट्रभक्ती दिसून येते. एकदा ते परीक्षा लवकर आटोपून टिळकांच्या भाषणाला गेल्यामुळे त्यांना मुख्याध्यापकाकडून शिक्षेला सामोरे जावे लागले. १९२० मध्येच टिळकांचा मृत्यू झाला. टिळकांच्या मृत्यूने त्यांना खूप त्रास झाला आणि आपले सर्व जीवन भारतमातेसाठी अर्पण करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मॅट्रीकच्या परीक्षेत्श असताना स्वामीजींची भेट महात्मा गांधीजींशी झाली. शेवटपर्यंत ते महात्माजींचे विश्वासू म्हणून राहिले. अमळनेरच्या नॅशलन कॉलेजमध्ये १९२१ मध्ये प्रवेश घेतला. आणि याच ठिकाणी त्यांनी आपले लेखन, वाचन आणि बक्तृत्व विकसित केले. पण काही कारणामुळे हे कॉलेज बंद पडल्यामुळे पुढे स्वामीजी टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून १९२५ मध्ये बाडमय विषारद झाले. १९२६ मध्ये स्वामीजींनी लोकशाहीचा विकास, या विषयावर प्रबंध लिहून एम.ए. चो पदवी प्राप्त केली. त्यांनी मिळविलेल्या महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणामुळे त्यांना वेगवेगळ्या विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त झाले आणि जीवनाकडे पाहण्याचा विशाल दृष्टिकोन प्राप्त झाला.

**कामगार विश्वात पदार्पण:-**

याचवेळी राष्ट्रवादी बाण्याचे व पुरोगामी विचाराचे ना. म. जोशी हे भारतातील मजुर चळवळीचे नेते व कायदे मंडळाचे सरकार नियुक्त सदस्य होते. त्यांना कामगारांची जाण असलेला एक सहाय्यक हवा होता. म्हणूनच १९२६ला स्वामीजी मुंबई गिरणी कामगार संघाचे उपसंघटक म्हणून ते कामाला लागले. स्वामीजींना प्रथमपासूनच गरिबांची जाण होती. म्हणूनच त्यांनी गिरणी मालकांच्या विरोधात कामगारांना बेतन, बेकारी आणि गिरणी मालकाकडून होणारे शोषण यासाठी संघटित केले. त्यांनी मुंबई, सोलापूर या ठिकाणी गिरणी मालकांचा संप घडवून आणला. यातून त्यांना दोन्ही वेळा तुरुंगात जावे लागले. कामगार विषयक विध्येयक मांडण्यासाठी ते जेव्हा दिल्लीला गेले त्यावेळी त्यांना पक्षघाताचा आजार झाला. यातून बरे झाल्यावर मात्र त्यांनी कामगार विश्व सोडले.

**शिक्षक म्हणून कार्य:-**

पुढे ते हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेत दाखल झाले. देशासाठी स्वतःला वाहून घेणारे तरुण कार्यकर्ते तयार करणे हे या शाळेचे उद्दिष्ट होते. इथूनच ज्ञान प्रकाश, नवाकाळ हे वर्तमानपत्र निघत होती. हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेत प्रवेश केल्यानंतर मुख्याध्यापकांची जबाबदारी केसरकरानंतर स्वामीजींवर आली. यावेळी बाबासाहेब परांजपे, एस. आर. देशपांडे, देविसिंह चौहान इ. त्यांच्यासारखेच उत्तम होते. स्वामीजी मुख्याध्यापक असून सुध्दा भिक्षा मागून अन्न सेवण करीत. येथेच स्वामीजींनी १४ जानेवारी १९३२ रोजी नारायण स्वामीजींच्या हस्ते सन्यस्थ वृत्तीची भिक्षा घेतली. यावेळी व्यंकटेशला विश्वकुटुंबाचा संदेश दिला आणि ते आता खेडगीकर नसून स्वामी रामानंद तीर्थकर झाल्याचे जाहीर केले.नंतर हिप्परगा येथील काही अप्रिय कारणामुळे स्वामीजी अंबेजोगाईच्या योगेश्वरी मूलन विद्यालयात गेले. बोड्याच दिवसात आपल्या सहका-यांच्या मदतीने त्यांनी विद्यालय प्रसिध्दीस आणले. १९३७ ला महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन परतूरला भरले. यावेळी स्वामीजीनी योगेश्वरी येथील मुख्याध्यापकाची जबाबदारी सोडून पूर्ण वेळ महाराष्ट्र परिषदेला द्यावी अशी विनंती केल्याने १९३८ मध्ये महाराष्ट्र परिषदेच्या दुस-या अधिवेशनावेळी त्यांना योगेश्वरी संस्था सोडण्याची परवानगी देण्यात आली. बोड्याच दिवसात ते महाराष्ट्र परिषदेचे सरचिटणीस झाले.

**महाराष्ट्र परिषदेतील योगदान :-**

स्वामीजीवर महाराष्ट्र परिषदेची संघटना बळकट करण्याची जबाबदारी आली. त्यावेळी ते हैदराबादला आले कारण हैदराबाद हे राजकीय शैक्षणिक आणि सामाजिक चळवळीचे केन्द्रबिंदू होते. ते श्रीरंगराव यांच्याकडे राहिले. आपल्या मूलभूत हक्कासाठी एक राजकीय संघटना असावी या विचारातूनच हैदराबाद स्टेट कॉंग्रेस स्थापन करण्याचा निर्णय झाला व एक अस्थायी समिती स्थापन केली गेलो. पण निजाम सरकार मात्र स्टेट कॉंग्रेसमधील 'कॉंग्रेस' याच शब्दाला विरोध करत होते. आणि आ.क्र. वाघमारे, स्वामी रामानंद तीर्थ यांनी मात्र 'कॉंग्रेस' शब्दाचा हट्ट धरला आणि १९३८ ला हेदराबाद स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह घडवून आणला. यावेळी त्यांना १११ दिवसाची

जेल झाली. महात्मा गांधीजीनी हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचा सभागृह स्थगित करताच त्यांची सुटका करण्यात आली. पुन्हा त्यांना महात्मा गांधीजींच्या वैयक्तिक सत्यागृहात १५ महिने तर १९४२ च्या छोडो भारत चळवळीत सोलापुरात गुप्तपणे कार्य केल्याने जेल झाली. १६ डिसेंबर १९४३ मध्ये त्यांची सुटका झाली. मध्यंतरीच्या काळात महाराष्ट्र परिषद, कर्नाटक परिषद आणि आंध्र परिषद एकत्र करण्यात स्वामीजींना यश आले. १९३८ ला हैदराबाद स्टेट कॉंग्रेसबर घातलेली बंदी निजामाने ३ जुलै १९४६ ला उठवली. जहाल व मधाळ यांच्यात वाद निर्माण झाले. मात्र स्थायी समितीच्या अध्यक्षपदी स्वामीजी यांचीच निवड झाली.

**हैदराबाद स्टेट कॉंग्रेसमधील कार्य :-**

१६, १७ व १८ जून १९४७ रोजी हेदराबाद स्टेट कॉंग्रेसचे अधिवेशन हैदराबाद व सिकंदराबाद या शहरामध्ये असलेल्या मुशिराबाद या भागात झाले. याच अधिवेशनात निजाम राजवट उलथून टाकण्यासाठी सर्वच एकमत झाले. याचवेळी इत्तेहादूल मुसलमीन ही अत्याचारी सशस्त्र सेना रझाकार या नावाने पुढे आली होती. याच दहशतवादी संघटनेचा प्रतिकार करण्यासाठी कृती समिती निर्माण करण्यात आली. यावेळी स्वामीजींना अटक झालीच तर कृती समितीतील आंदोलनास मार्गदर्शन करण्याचे अधिकार देण्यात आले. यावेळी मोर्च, आंदोलनास ऊत आला. ७ ऑगस्टला स्वामीजी सुलतान बजार तर १५ ऑगस्ट या दिवशी निजाम सरकारची बंदी असतानाही खांद्यावर तिरंगा घेऊन ते गेले. त्यावेळी स्वामीजींना चंचलगुडा जेलमध्ये पकडून टाकण्यात आले. यावेळी तेलंगणा, कर्नाटक व मराठवाड्यातील २१००० लोक सामील झाले यामागे स्वामीजींची प्रेरणा होती. ३० नोव्हेंबर १९४७ रोजी जेलमधून सुटल्यानंतर स्वामीजींनी हैदराबादच्या चारही भागाचा दौरा करुन लोकांना हैदराबाद मुक्ती संग्रामात सामील होण्याचे आव्हान केले. तसेच हेदराबाद संस्थान भारतात विलिन करुन घेण्यासाठी शस्त्राचा वापर कसा करावा लागेल हे गांधीजी व जयप्रकाश नारायण यांना पटवून दिले. यावेळी झेंडा बंदन, जंगल सत्याग्रह, रेल्वे रुळ, उखडणे असे कार्यक्रम हाती घेतले.शेवटी भारत सरकारने रझाकारांनी घडवून आणलेला रक्तपात निजामांचा करारभंग याला उत्तर म्हणून १३ सप्टेंबर १९४८ रोजी मंजर जनरल चौधरी यांच्या नेतृत्वाखाली लष्करी कारवाई केली. १०९ तासात १७ सप्टेंबर १९४८ निजामसत्ता संपुष्टात आणली.

**समारोप :-**

हैदराबादच्या निजामांची जुलमी सत्ता, त्यांचे धार्मिक धोरण, समाजातील विषमता याच्या विरोधात स्वामी रामानंद तीर्थ यांनी आवाज उठविला. यामुळे महाराष्ट्रच नव्हे तर कर्नाटक, तेलंगणा व मराठवाडा येथील लोकांमध्ये प्रबोधन घडवून आणले. महाराष्ट्र परिषदेसाठी एकत्र होण्याचे आव्हान मराठवाड्यातील जनतेला केले. तसेच स्टेट कॉंग्रेसमधील कार्यासाठी त्यांनी केलेल्या आव्हानास मोठ्या प्रमाणात जनतेचा प्रतिसाद मिळाला. त्याचाच परिणाम म्हणून त्यांना अनेकवेळा जेलमध्ये जावे लागले. परंतु त्यांचे अथक परिश्रम, धाडस यामुळे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली निजामी सत्तेचा शेवट झाला. यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान अविस्मरणीय व अनमोल असे आहे.

**संदर्भग्रंथ-:**

1. भालेराव अनंत, हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मुंबई, मौज प्रकाशन गृह, २००१.
2. Gazetteer of India, Maharashtra State, District Nanaded, Mumbai, 2011.
3. रोडे सोमनाथ, मराठवाडयाचा इतिहास, विदया बुक्स पब्लीशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, १९९९. ४) काटे पी.व्ही., मराठवाडयाचा इतिहास, केलास पब्लिकेशन्स, औरंगपूरा, औरंगाबाद, १९९९
4. खडकेकर बाळकृष्ण, हेदराबाद मुक्ती लढयाची जडणघडण, इसाप प्रकाशन, नांदेड, ३ ऑक्टो २०१४.
5. कठारे / केन्द्रे, हैदराबाद संस्थान आणि महात्मा गांधीजी, पुनम प्रकशन, कंधार, प्रथम आवृत्ती, २००९.
6. Luther Narendra Hyderabad a Biography, Oxford University Press, 2006.
7. बिंदू दिगंबरराव, हैदराबाद राज्याचे विसर्ज